पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २१

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०२/२०१८** वेळ - सकाळी **११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०६/०२/२०१८** रोजी सकाळी **११.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.भोईर सुरेश शिवाजी
४. मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत
५. मा.यादव मीनल विशाल

याशिवाय मा.डोईफोडे–सहाय्यक आयुक्त (प्रशासन), मा.शेख एम.बी.–उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्य यांचे मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले-</u>**

विषय क्र.४) पिंपळे सौदागर व रहाटणी येथील उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणे या कामास सुधारित प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव...

विषय क्र.५) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे सार्वजनिक वाचनालये विषयक कामे करणेबाबत - मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.६) प्र.क्र.२३ येथील थेरगाव गावठाण ते डांगे चौक येथील रस्ता रूंदीकरणामध्ये धोकादायक ठरणारे म.रा.वि.वि.कं.नी चे फिडर, पिलर्स स्थलांतरीत करणेसाठी Change of Site (कामांच्या ठिकाणात बदल) मान्यता मिळणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव...

विषय क्र.७) कस्पटेवस्ती BRTS रोडवर काळेवाडी चौकात डी.आय. पाईपलाईन पुरवून टाकणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव...

विषय क्र.८) सभा आयोजनाबाबत - मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव...

----------

दिनांक **१९/०१/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक – २०**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले..

----------

ठराव क्रमांक – ७३ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा. सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

विषय - नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ येथील स्वच्छता गृहाचे नुतनीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा. अश्विनी जाधव अनुमोदक – मा.मीनल यादव

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.मीनल यादव यांचा प्रस्ताव –

विषय - वॉर्ड क्रमांक ५७ कवडेनगर येथील नाल्यामधील जलनि:सारण लाईनची सुधारणा विषयक कामे करणे हे काम नविन वॉर्ड क्र.३१ मध्ये ठिकठिकाणी करण्यास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा. अश्विनी जाधव अनुमोदक – मा.मीनल यादव

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा. मीनल यादव यांचा प्रस्ताव –

विषय – सांगवी प्रभाग क्र.६० मधील प्रियदर्शनीनगर एस.टी.कॉलनी मध्ये ड्रेनेज चेंबर आर.सी.सी. करणे हे काम नविन वॉर्ड क्र.३२ मध्ये ठिकठिकाणी करण्यास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – ७६ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा. सुरेश भोईर अनुमोदक – मा.आश्विनी जाधव

संदर्भ – मा. सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

पिंपळे सौदागर व रहाटणी येथील धर्मवीर संभाजी उद्यानात स्थापत्य विषयक काम चालू आहे. उद्यानातील आवश्यक कामे पूर्ण करणेकामी नि.नो.क्र.०५/४२/२०१७/२०१८ या कामासाठी र.रू.५०,००,०००/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख फक्त) सुधारित प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क कार्यक्षेत्रातील, प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथे सार्वजनिक वाचनालये विषयक कामे करणेसाठी निविदा काढणेत आलेली होती. परंतु प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी मध्ये सदर वाचनालयाचे ठिकाणी न्यायालयाचे स्थलांतरण होत असलेने ठेकेदारास सदर ठिकाणी काम करता येत नाही. त्यामुळे प्रशासकिय व तांत्रिक बदलामुळे कामाच्या स्वरूपात बदल होत आहे. प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे सार्वजनिक वाचनालये विषयक कामे करणे ऐवजी सदरच्या कामामधून त्याच प्रभागात स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०६/०२/२०१८ विभाग – ग क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.गक्षेका/वि/कावि/१६/२०१८ दि.२/२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी उपविभागातील वॉर्ड क्र. ४३ ते ४७ या परिसरातील रस्त्यावरील रूंदीकरणातील व सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने म.रा.वि.वि. मंडळाचे लघुदाब व उच्चदाब खांब तार व फिडर पिलर हलविणे (नि.क्र.९/६-१६/१७) हे काम प्र.क्र.२३ येथील थेरगाव गावठाण ते डांगे चौक येथील रस्ता रूंदीकरणामध्ये धोकादायक ठरणारे म.रा.वि.वि.कं.नीचे फिडर,पिलर्स स्थलांतरीत करणेसाठी Change of Site (कामांच्या ठिकाणात बदल) (निविदा र.रू.११,९९,९९९/- दर ११.९९% कमी) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.सुरेश भोईर,मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

कस्पटेवस्ती जवळील पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता BRTS रोडवर काळेवाडी चौकात ३०० मी.मी. व्यासाची ७५ मी. लांबीची डी.आय. पाईपलाईन पुरवून टाकणे आवश्यक आहे. सदर काम तातडीचे असल्याने हे काम सन २०१७-१८ करिता पिंपळे निलख, जगताप डेअरी परीसरात व्यवस्थेत सुधारणा करणेकामी नवीन पाणीपुरवठा नलिका पुरविणे व टाकणे. (निविदा क्र.१०/३७/२०१७-१८) या कामातून करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८० विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०६/०२/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विधी समितीची दि.१६.०२.२०१८ ची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २३/०२/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/६८/२०१८
दिनांक : ०९/०२/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.